# आसाम आंदोलन : काही दुर्लक्षित समस्या

दीड वर्ष होत आले. आसाम आंदोलन गाजते आहे. रोज वर्तमानपत्रात बातम्या झळकताहेत

* ४ ऑक्टोबर १९७९ : आसामच्या मुख्यमंत्र्यांनी न्यायियर्क कायवाही करून परकीयांची आसाम बाहेर रवानगी करण्याचा सरकारचा निश्चय जाहीर केला. आसाम आंदोलन हिंसक बनू लागले.

* २७ डिसेंबर १९७९ : नारंगीहून बरौनीला क्रूड वाहतूक आंदोलकांनी थांबविली.

* ५ एप्रिल १९८० : आसाम राज्य अशांत टापू म्हणून जाहीर.

* ६ जुलै १९८० : सरकारी कचेऱ्या, बँका, रेडिओ यावर दोन आठवडे निरोधने.

* १४ फेब्रुवारी १९८१ : गेल्या दोन दिवसात बाँब स्फोटाचे तीन प्रकार घडल्याने आसाममधील तेलाचे साठे व पेट्रोल वितरण केंद्रांवर निमलष्करी सैन्याचा पहारा.

आसाममध्ये परकीयांविरुद्ध आंदोलन चालू आहे. सभा, निरोधने, मोर्चे, सत्याग्रह, नाकेबंदी इत्यादी मार्गाने आंदोलक आपल्या मागण्यांसाठी दबाव आणीत आहेत. बिगर आसामिया आसाम सोडत आहेत इत्यादी बातम्या आपण वाचतो. त्यावरून परिस्थिती फार गुंतागुंतीची आहे, स्फोटक आहे असे जाणवते. आसाम आंदोलनात गुंतलेले प्रश्न ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन थोडक्यात मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

भारताच्या ईशान्य दिशेस ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यात हिमालयाच्या पायथ्याशी आसाम राज्य आहे. दरवर्षी नदीतून गाळ वाहून येत असल्याने ब्रह्मपुत्रा खोरे मोठे सुपीक आहे. आसामच्या सभोवताली मेघालय, त्रिपुरा, मणीपूर, नागालँड आदी राज्ये आहेत. नैर्ऋत्येस बंगला देश आहे. आसामचे क्षेत्रफळ ७८५०० चौरस किलो-मीटर (महाराष्ट्र राज्याच्या एक चर्तुथांश एवढे) आहे व १९७१ मध्ये तेथील लोकसंख्या १४६ लाख होती. आसाममध्ये ९०% लोकसंख्या खेडोपाडी राहाते. १९७१ च्या जनगणनेनुसार आसाममधील कामकऱ्यांची संख्या ४१ लाख होती, त्यातील ५५% शेतकरी, १०% शेतमजूर, १०% मासेमारी, गुरे पाळणे आदी व्यवसायात होते. आसाममधील मुख्य पीक भाताचे. कसलेल्या जमिनीपैकी ७०% जमीन भाताखाली आहे. चहाचे मळे हे आसामचे वैशिष्टच. चहाउद्योगात सुमारे ४ लाख कामगार काम करतात.

## धावता इतिहास

१३ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत शान वंशाच्या आहोम राजांच्या आधिपत्त्याखाली आसाम प्रांत होता. ह्यात आसामी लोक राहात असलेले ब्रह्मपुत्रा खोरे व गारो, जान्तीया, खासी आदी लोक राहात असलेला डोंगरी भाग समाविष्ट होता. १८२६ मध्ये ब्रिटिशांनी आसामवर ताबा मिळविला. प्रारंभी आसाम हा बंगाल प्रांताच्या आधिपत्त्याखाली होता. तो १८७० मध्ये अलग करण्यात आला. १९०५ साली ब्रिटिशांनी बंगालची फाळणी केली. पूर्व बंगाल व आसाम मिळून एक प्रांत व पश्चिम बंगलचा दुसरा प्रांत. फाळणीमुळे वंगभंगविरोधी मोठी चळवळ बंगालमध्ये व भारतात इतरत्र उभी राहिली. आसाम व पूर्व बंगाल एकत्र जोडणे हे आसामियांना मान्य नव्हते. अखेर १९१२ मध्ये ब्रिटिशांना फाळणी रद्द करावी लागली व आसाम प्रांत मुख्य आयुक्तांच्या देखरेखीखालील प्रांत म्हणून पुनर्स्थापित झाला. आसामच्या दक्षिण भागात बहु-संख्येने बंगाली लोकसंख्या असलेले सिल्हेट व काचार जिल्हे होते. १९४७ च्या फाळणीमध्ये सार्वमतानंतर

सिल्हेट जिल्हा पूर्व पाकिस्तानमध्ये गेला. सिल्हेटच्या पूर्वेस असलेला काचार आसाममध्ये राहिला.

१९४७ सालचा आसाम प्रांत बहुरंगी होता. त्यामध्ये आसामी, गारो, खासी, जान्तिया, काचारी, बंगाली, नेपाळी आदी लोक होते. डोंगराळ विभागातील जमातींची स्वतंत्र राज्याची जोरदार मागणी होती, त्यासाठी त्यांनी प्रदीर्घ लढा दिला आणि १९६३ मध्ये नागालँडला मान्यता मिळाली पुढे १९७१-७२ मध्ये मेघालय राज्य आणि अरुणाचल प्रदेश व मीझोराम हे केंद्र शासित प्रदेश स्थापन करण्यात आले. १९७१ च्या जन गणनेनुसार आसामचे भाषिक चित्र पुढीलप्रमाणे होते.

**आसामचे भाषिक चित्र**

१९७१ ची लोकसंख्या (आकडे हजारात)

| भाषा | ब्रह्मपुत्रा खोरे | स्वायत्त डोंगर विभाग | काचार जिल्हा | एकूण आसाम | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| आसामिया | ८८४४ | ५४ | ७ | ८९०५ | ६०.९ |
| बंगाली | १५०२ | ४८ | १३३२ | २८८२ | १९.७ |
| हिंदी | ५६७ | ३२ | १९३ | ७९२ | ५.४ |
| नेपाळी | ३१६ | २९ | ४ | ३४९ | २.४ |
| एकूण (बिगर आदिवासी भाषा) | ११८७९ | ३७१ | १५५३ | १३८०३ | ९४.४ |
| एकूण आसाम राज्य | १२४५७ | ४५५ | १७१३ | १४६२५ | १००.० |

सबंध आसाम राज्यात १९७१ मध्ये आसामिया सुमारे ६१ % तर बंगाली जवळ जवळ २० % होते. ब्रह्मपुत्रा खोऱ्यामध्ये आसामियांचे प्रमाण ७१ % व बंगाल्याचे प्रमाण १२ % होते. धार्मिक दृष्टचा पाहाता सुमारे ७२ % हिंदू, २५ % मुसलमान व ३% इतर धर्मीय होते.

## आर्थिक बदल

ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली येईतो आसामधील सखल प्रदेशात भातशेती व मांसेमारी आणि डोंगर विभागात स्थलांतरित शेती व जंगलातील पशु व वन संपत्ती ही उपजीविकेची साधने होती. १८२१ मध्ये ब्रिटिशांना आसामधील चहाचा शोध लागला आणि पुढे आसाममध्ये ब्रिटिश मालकीचे चहाचे मळे उभारण्यासाठी सरकारने उत्तेजन दिले. मळे लावण्यातील मुख्य अडचण म्हणजे मनुष्यबळाची. जंगली व रोगट प्रदेशामध्ये कमी वेतनावर अपार कष्ट उपसण्यासाठी येण्याचें आसामी शेतकऱ्यास काहीच कारण नव्हते. सुपीक खोऱ्यात भातशेती, मासे, परसात सुपारी, केळी, पानवेली, बांबू यातून रोजच्या जवळपास सगळ्या गरजा भागत. कापडही घरोघरी स्त्रिया हातमागावर विणत. तेव्हा ब्रिटिशांनी कंत्राटदारांमार्फत धाकदपटशा व बनवाबनवीच्या मार्गाने मध्य भारतातील गरीब आदिवासींना वेठीस धरले आणि सुमारे ७० वर्षात ७६४ मळे उभारले. त्यात ४ लाख कामगार होते. चहाच्या मळ्यावर कामासाठी कामकऱ्यांची आवक चालूच राहिली. बरेच चहाकामगार आसामिया भाषा शिकले व आसामी जीवन प्रवाहात सामावले.

१९ व्या शतकामध्ये ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील बराच प्रदेश जंगली व रोगट होता. मलेरिया व प्लेगने ग्रासलेला होता. ह्या परिस्थितीत काहीशी सुधारणा झाल्यावर १९०० सालानंतर हा भाग लागवडीखाली येऊ लागला. येथे जंगल तोडून शेती सुरू करणे मोठे कष्टाचे होते. पूर्व बंगालमधील मैमनसिंग व रंगपूर ह्या दाट लोकवस्तीच्या जिल्ह्यातून मुसलमान कष्टकरी ह्या भागात मोठ्या प्रमाणात आले. आणि प्रामुख्याने सिल्हेट व गोलपारा जिल्हात स्थायिक झाले.

नेपाळमधील कष्टकरी रवराचे मळ्यावर किंवा गुरेपाल, शेतकरी म्हणून स्थायिक झाले. उत्तर प्रदेश, बिहारमधून मजूर, हमाल, कामगार आले. पंजाबमधून कारागीर आले. आसाममधील स्थानिक लोकांना डावलून किंवा मागे सारून हे कष्टकरी स्थायिक झाले नाहीत. तर आर्थिक विकासाच्या क्रमात ते सामावले

गेले. **१९११ ते १९२१ ह्या दशकात भारताची लोकसंख्या सार्थीच्या थैमानाने काहीशी घटली तर आसामची लोकसंख्या २०% ने वाढली.** आसाम प्रांतात नवनवीन लोकांना सामावून घेण्याची प्रक्रिया अनेक दशके चालू आहे.

ब्रिटिश राजवटीच्या स्थापनेनंतर नवीन शासनयंत्रणा, न्यायदानव्यवस्था, पत व व्यापार व्यवस्था अमलात आली. त्या अनुषंगाने नोकरशाही व व्यावसायिक क्षेत्र नव्याने निर्माण झाले. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या पाश्चिमात्य धरतीवरील नवीन शिक्षण संस्थांतून शिकून बाहेर पडलेल्यांनाच नोकरशाही व वकिली, डॉक्टर इ. क्षेत्रात प्रवेश करणे शक्य होते. आसाम प्रांत अजूनही प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून असल्याने नवीन शिक्षणाच्या प्रसारास यथे अनुकूलता नव्हती तर बंगालमध्ये आधुनिक उद्योगधंदे व व्यापार यांची वाढ झाल्याने कलकत्त्यासारख्या शहरात शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला. यामुळे बंगाली शिक्षित वर्ग आसाममधील नोकऱ्या व व्यवसाय मोठ्या प्रमाणत मिळवू शकला. आसाममधील चहाच्या मळ्याचे एजंट म्हणून तसेच ठोक व किरकोळ व्यापार आणि पतव्यवहार यामध्ये मारवाड्यांचे वर्चस्व प्रारंभापासूनच प्रस्थापित झाले.

१९४७ साली फाळणी झाल्यावर आसाम प्रांत त्याच्या स्वाभाविक भूप्रदेशापासून तोडला गेला. आसामचा व्यापार हा मोठ्या प्रमाणात जलमार्गाने चाले. फाळणीनंतर भारतातून आसामला जाणारा सोपा मार्गच नव्हता. १९४९ मध्ये बंगालच्या निमुळत्या पट्टीतून आसामला जोडणारा रेल्वे मार्ग झाल्यावरही जलवाहतुकीपेक्षा रेल्वे वाहतूक बरीच खर्चिक असल्याने व्यापारावर परिणाम झाला. आसामचा बराच व्यापार पूर्व बंगालबरोबर होता, तो पाकिस्तानची निर्मिती झाल्यावर कमी होत गेला आणि १९६५ च्या पाकिस्तान बरोबरच्या युद्धानंतर जवळपास थांबलाच. या सर्वाचा अनिष्ट परिणाम आसाममधील अर्थव्यवहारावर झाला.

१९५१ नंतर नियोजनाकाळामध्ये आसामधील वीजपुरवठा व दळणवळणाच्या सोयी वाढवविणे हे अग्रक्रमाचे होते. तेथील नैसर्गिक खनिजे व जंगलसंपत्ती याच्या उपलब्धतेमुळे तेलनिर्मितीचे प्रकल्प आणि कागद, प्लायवूड इत्यादी निवडक उद्योग आसाममध्ये सुरू झाले. परंतु भारतातील अनेक मागास राज्यांप्रमाणे प्रामुख्याने शेतीप्रधान व कच्चामाल पुरवणारा विभाग असे जे आसामचे स्थान वासाहतिक काळात होते त्यामध्ये मूलतः फरक पडला नाही. तसेच तेथील व्यापार व इतर अर्थव्यवहारांवरील मारवाड्यांचे वर्चस्व व युरोपीयांचा प्रभाव हे टिकून राहिले.

आर्थिक विकासाचे काही निकष तपासल्यास उत्तर प्रदेश अथवा बिहार ह्याहून आसाम राज्य खास मागासलेले नाही आणि ग्रामीण विभागातील गरीब कुटुंबांचे प्रमाण तर पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक आहे असे आढळून येते.

**निवडक आर्थिक निर्देशांक**

(आसामच्या सांख्यिकीय निर्देश पुस्तिकेवरुन)

| | आसाम | बिहार | उत्तर प्रदेश | पश्चिम बंगाल | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|---|
| साक्षरतेचे प्रमाण टक्केवारी (१९७१) | २९ | २० | २२ | ३३ | ३९ |
| दर १०० चौ.कि. प्रदेशास रस्त्याची लांबी–कि. (१९७५) | ४० | ६९ | ४२ | ६४ | ३४ |
| दरडोई विजेचा वापर किलोवॅट तास (१९७५) | २८ | ८४ | ७३ | ११९ | १७९ |
| भाताचे उत्पादन किलो./हेक्टर (१९७१–७२ ते १९७५–७६) | ९०३ | ८४७ | ८२५ | १२०१ | १०८५ |

| | आसाम | बिहार | उत्तर प्रदेश | पश्चिम बंगाल | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|---|
| नागर लोकसंख्या टक्केवारी–१९७१ | ९ | १० | १४ | २५ | ३१ |
| दरडोई उत्पन्न–रुपये (१९७२–७३ व १९७४–७५) | ९९७ | ६०४ | ७३२ | ९२५ | २०६२ |
| एकूण ग्रामीण कुटुंबात गरीब* कुटुंबाची टक्केवारी (१९७१) | ३५.९ | ३५.४ | २४.० | ४७.० | ३५.५ |

आसामध्ये गेल्या वीस वर्षांत शिक्षणामध्ये, विशेषत: महाविद्यालयीन शिक्षणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. व त्यामुळे नोकरी शोधणाऱ्यांच्या संख्येत सतत भर पडत गेली. त्यामानाने औद्योगिक व नागरविकास अल्पसाच झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष व अस्वस्थता वाढल्याचे दिसून येते.

**आसाममधील विद्यार्थ्यांची संख्या**

| वर्ष | प्राथमिक शाळा (आकडे लाखात) | माध्यमिक शाळा (आकडे लाखात) | महाविद्यालय व विद्यापीठ (आकडे हजारात) |
|---|---|---|---|
| १९५६–५७ | ८.३ | ३.२ | १६ |
| १९७६–७७ | १५.४ | ९.० | ९७ |

## आसामिया राष्ट्रवादाची पूर्वपीठिका

भारतातील प्रत्येक प्रांतीयांमध्ये भारतीय व प्रादेशिक सांस्कृतिक अशी दुहेरी अस्मिता दिसून येते, तशी ती आसामियांमध्येही होती. ब्रिटिशांच्या राजवटीनंतर प्रारंभीच्या काळात आसामिया भाषेस अधिकृत स्थान नव्हते. ते मिळविण्यासाठी आसाममध्ये चळवळी झाल्या. १८७२ मध्ये प्राथमिक शाळा व न्यायालयातील व्यवहारात आसामिया भाषेस स्थान मिळाले, १९०० पासून आसामिया भाषा ही माध्यमिक शाळेत माध्यम म्हणून स्वीकारली गेली आणि १९०४ मध्ये कलकत्ता विद्यापीठात दुसरी भाषा म्हणून मान्य झाली. परंतु बंगाल प्रांत शिक्षणामध्ये आघाडीवर असल्यामुळे नोकरी-व्यवसायातील बंगाल्यांचे प्रमाण लक्षणीय राहिले. त्यातच ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' ह्या आपल्या नीतीनुसार बंगाली व आसामी ह्यामधील दुजाभावास खतपाणी घातले. १९१७ साली "आसाम साहित्य सभा" स्थापन झाली आणि १९२६ मध्ये 'आसामिया संरक्षिणी सभा' स्थापली गेली. बंगाली भाषा व संस्कृती, आसामी संस्कृतीच्या विकासाला अडथळा आणीत आहे ह्या भावनेने आसामी संस्कृतीच्या विकासाच्या मागणीत बंगाली विरोधाची बीजे रुजू लागली.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये राष्ट्रीय काँग्रेस ब्रिटिशविरोधी लढ्यात गुंतली होती तर आसाम सभा आसामी अस्मितेचा प्रश्न प्रमुख मानीत होती. फाळणीच्या धामधुमीमध्ये बंगाली हिंदूंचा पाठिंबा महत्त्वाचा होता, त्या काळात संकुचित आसामी राष्ट्रवादाने एवढा जोर धरला नाही. त्या नंतर मात्र आसाममध्ये बिगर आसामी विरोधी आंदोलने उफाळली (उदाहरणार्थ, १९४८, १९६०, १९ ५, १९७०–७२, १९७९–८०). परप्रांतीयांना स्थलांतरास बंदी घालावी, स्थानिक नोकऱ्यांमध्ये भूमिपुत्रांना अग्रक्रम द्यावा, राखीव जागा ठेवाव्या इत्यादी मागण्या घेऊन १९६५ मध्ये लचित सेना पुढे आली (लचित पुखन या नेत्याने १६७१ मध्ये मोंगलाचा पराभव केला होता) महाराष्ट्रातील शिवसेनेप्रमाणे लचित सेना हे नाव पडले. संकुचित राष्ट्रवाद फैलावण्यात तिचे बळ होते.

१९७२ साली गोहत्ती विद्यापीठाच्या विद्वत् सभेने विद्यापीठामध्ये आसामिया भाषा माध्यम म्हणून वापरली जावी त्याबरोबर इंग्रजी हेही माध्यम राहील आणि विद्यार्थ्यांना आसामिया, इंग्रजी किंवा बंगाली मध्ये उत्तरपत्रिका लिहिण्याचा विकल्प असावा असा ठराव संमत केला. ह्या निर्णयामुळे आसामी विद्यार्थ्यांमध्ये विरोधाची प्रचंड लाट उसळली, त्यांनी बंगाली भाषेचा विकल्प न ठेवण्याची मागणी केली. आंदोलनाच्या दडपणाखाली विद्वत् सभेने आपला निर्णय

* २५०० रुपयांपेक्षा कमी मालमत्ता असलेली कुटुंबे.

फिरवण्याचा विचार केला; त्यास काचारमधील बंगाली विद्यार्थ्यांनी विरोध केला आणि सुप्रीम कोर्टाकडे धाव घेतली. सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली. भाषावार पुनर्रचना आयोगाने यासंदर्भात सुचविलेला निकष असा : एकाद्या राज्यात ७०% हून अधिक लोकसंख्या विशिष्ट भाषेची असेल तर ते राज्य एकभाषिक मानावे अन्यथा ते बहुभाषिक असावे. ह्या निकषानुसार आसाममध्ये आसामिया व बंगाली दोन्ही भाषांना स्थान देण आवश्यक ठरते.

राज्यविधान सभनेही पुढे विद्वत् सभेच्या मूळच्या ठरावास पाठिंबा दिला. त्याला अखिल आसाम विद्यार्थी संघटनेने जोरदार विरोध केला. बंगाल्यांविरोधी दंगली उसळल्या व हिंसक विरोधाखाली नमून मुख्य मंत्र्यांनी जाहीर केले की, लोकमताचा विरोध लक्षात घेता विधानसभेच्या निर्णयाची कार्यवाही होणार नाही. (मराठवाडा विद्यापीठास डॉ. आंबेडकर मराठवाडा हे नाव देण्याबाबतच्या महाराष्ट्र विधानसभेच्या निर्णयाची जी गत झाली तशीच) मुख्यमंत्र्यांच्या विधानाने अल्पसंख्यांक अस्वस्थ झाले व घटनेने अल्पसंख्यांकास दिलेले संरक्षण आपणास मिळू शकत नाही अशी भीती निर्माण झाली.

अशा रीतीने आसामी–बिगर–आसामी वाद धुमसत आहे, चिघळत आहे आणि गेल्या १५ महिन्यांत तो धोकादायक बनला आहे.

## परकीयांना हुसका

आसाममध्ये परकीयांच्या विरुद्धचे आंदोलनास जोर आल्यास आता १५ महिने झाले. आसाम आंदोलनाचे पुढारीपण अखिल आसाम विद्यार्थी संघटना व गणसंग्राम परिषद करीत आहेत. त्यामध्ये आसाम साहित्य सभा, पूर्वचलीय लोक परिषद आणि आसाम जातीयवादी दल सामील आहेत. १९५१ साल हे प्रमाण-वर्ष मानून परकीयांना आसाममधून हकला अशी प्रमुख मागणी आहे. अशा परकीयांची संख्या किती आहे? त्याबद्दल निरनिराळी आकडेवारी पुढे येत आहे. ४५ लाख किंवा त्याहून अधिक म्हणजे आसामच्या आजच्या लोकसंख्येच्या जवळपास चवथा हिस्सा एवढे परकीय आहेत असा दावा केला जात आहे.

परकीयांच्या घुसखोरीमुळे आसामिया अल्पसंख्येत जाणार, त्यांची अस्मिता मारली जाणार अशी भीती व्यक्त केली जाते, त्याला वास्तवात काही आधार आहे का ते प्रथम पाहू. १९३१ ते १९५१ या काळात आसामिया भाषिकांची लोकसंख्या (पुनर्रचित आसामाचे क्षेत्र विचारात घेता) ३६% पासून ६२% पर्यंत वाढली तर बंगाल्यांची ३०% पासून २१% पर्यंत घटली. १९५१ नंतर हे प्रमाण तेवढेच राहिले आहे. आसाममध्ये मुसलमानांची लोकसंख्या सुमारे २५% आहे. १९६१ ते १९७१ ह्या सालात आसाममधील एकूण लोकसंख्या ३५ टक्क्याने वाढली, ह्या काळात हिंदूची ३७% तर मुसलमानाची ३१ टक्काने वाढ झाली. **गेल्या तीस वर्षांत प्रचंड प्रमाणात परकीयांनी घुसखोरी केल्याने आसामी लोक अल्पसंख्येत जाणार ह्या बागुलबुवास वास्तवात काही आधार आढळत नाही.**

१९५१ हे प्रमाण वर्ष धरावे ही आंदोलकांची मागणी तर केंद्र सरकारमार्फत १९७१ हे मूलभूत वर्ष म्हणून सुचविण्यात येत आहे. भारतातील नागरिकत्वाच्या कायद्यानुसार भारतामध्ये जन्मलेले मूल भारतीय नागरिक होय (मुलाचे आईवडील परकीय असून त्यांनी तशी नोंद मुद्दाम केली तर वेगळे) तसेच भारतात १० वर्षे वास्तव्य असणाऱ्यास भारतीय नागरिकत्वाचा हक्क आहे. १९७१ हे जर प्रमाण वर्ष धरले तर परदेशामधून (मुख्यतः बांगला देशमधून) आसामात आलेल्यांची संख्या सुमारे ३ लाख भरेल. १९७१ नंतर जे घुसखोर असतील त्याबाबतची माहिती काढून कायदेशीर कारवाई करणे आणि सीमेवर अधिक कडक लक्ष ठेवून घुसखोरीस आळा घालणे यास केंद्र सरकारने तयारी दर्शविली आहे. घुसखोर व स्थलांतरित–निर्वासित (बांगला देशमधून अनिच्छेने सुरक्षिततेसाठी बाहेर पडलेले) ह्यात भेद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. परकीय ह्या शब्दाने ह्या दोहोत गल्लत होत आहे. गणसंग्राम परिषदेचा आग्रह आहे १९५१ चा. याचा अर्थ होतो, अनेक भारतीय नागरिक व त्यांची मुले यांनाही हुसकविण्याचा!

## आंदोलनाचे स्वरूप

आज आसामच्या आंदोलनात पुढाकार कोणाचा

आहे ? तर मध्यवर्गीयांचा ! त्यामध्ये प्रचंड संख्येने विद्यार्थी सामील आहेत. सरकारी कर्मचारी व स्थानिक उद्योगपती व व्यापारी, व्यावसायिक व जमीनमालक आहेत. (आसामाध्ये अनेक नोकरदार छोटे जमीन मालक आहेत) तसेच ह्या थरातील स्त्रिया त्यामध्ये सहभागी आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मिशनरी व काही साम्राज्यवादी–परकीय संघटना यांचा आंदोलनाला सक्रीय पाठिंबा आहे.

आसामातील अर्थव्यवहारावर परकीय व मक्तेदारी भांडवलदारांचे (भारतातील इतर राज्यांप्रमाणेच) वर्चस्व आहे आणि त्यामुळे नवोदित प्रांतिक उद्योजक व धंदेवाईक यांना पुढे येण्यास वाव मिळत नाही. परंतु **आजच्या आंदोलनामध्ये परकीय वा मक्तेदारी भांडवल अथवा जमीनदार या विरुद्ध आवाज उठविलेला दिसत नाही तर छोटे उद्योगधंदे, व्यवसाय व नोकऱ्या यांमध्ये असलेले बिगर आसामिया हे आंदोलनाचे लक्ष्य बनले आहे.** आज आर्थिक विकास वेगाने का होत नाही, त्यात सर्व कामकरी–कष्टकरी सामावले का जात नाहीत, यामध्ये अडसर कोणते हे मूलभूत प्रश्न विचारात घेतले जात नाहीत. **जोबर आर्थिक मक्तेदारी आणि अर्थसत्तेचे केंद्रीकरण ह्यास आव्हान दिले जात नाही तोवर आर्थिक विकासास गती येणार नाही ही वस्तुस्थिती लक्षात न घेता उपलब्ध असलेल्या अत्यंत मर्यादित नोकऱ्या व रोजगार ह्याच्या वाटणीसाठी भांडण सुरू आहे.** 'आज आपल्या प्रांतात परप्रांतीयांना नोकरी मिळते आहे. प्रत्येक गट आपल्या भाईबांधवांना आसरा देत आहे. नेमणूक, बढती याबाबत विशिष्ट गटांचे हितसंबंध जोपासले जात आहेत.' असा प्रचार करून अल्पसंख्यांकाना हुसकून काढण्यासाठी वातावरण तापवले गेले आहे. ही गोष्ट धर्मजात व प्रांतीयता अशा सर्व पातळीवर घडताना आपणास दिसते. उदा०, मराठवाड्यातील दलित–सवर्ण झगडा जातीय पातळीवर झाला तर आसाममध्ये आज धार्मिक व प्रांतीय आधार घेऊन संकुचित राष्ट्रवाद पद्धतशीरपणे जोपासला जात आहे. संकुचित हितसंबंधांवर आधारित संघटना उभी करून इतरांच्या प्राणवित्ताचीही कदर करू नये असे विखारी स्वरूप त्यास येत आहे. परिणामी कामगार नोकरदार, ह्यांमध्ये हिंदू–मुसलमान, आसामिया-बंगाली अशी दरी निर्माण होत आहे. यामुळे कामगारांची ट्रेड युनियन कमकुवत बनते व त्याचा फायदा बडे भांडवलदार उठवतात. कुळांमध्ये फूट पाडून त्याचा फायदा जमीनमालकांना होतो. मक्तेदारी शक्तींविरुद्ध लांब पल्ल्याचा लढा उभारण्याइतकी ताकद आणि आवश्यक ती दिशा व पुढारीपण आज आसाममधील कामगार, छोटे शेतकरी, कुळे आदी कष्टकरी वर्गास मिळालेले नाही आणि अशा परस्थितीत नोकरी, रोजगार मिळेल ह्या आशेने बिगर आसामी नोकरदार व कष्टकऱ्यांविरोधी लढ्यात सामान्य जनताही ओढली गेल्याचे आपणास दिसत आहे. अर्थात त्यात आदिवासींचा सहभाग फारसा दिसत नाही. कारण आदिवासींचा प्रमुख प्रश्न आहे जमिनीच्या हस्तांतराचा; त्यामध्ये त्यांना संरक्षण हवे आहे. आदिवासींचा दुसरा प्रश्न आहे शिक्षणाचा. आसामिया भाषेत शिक्षण लादू नये असा त्यांचा आग्रह आहे. चहाच्या मळ्यात काम करणारे कामगार मूलतः बहुसंख्येने जरी आसाम बाहेरून आले असले तरी ते स्थानिक जीवनात बरेच सामावून गेलेले आहेत. आंदोलनात त्यांना सामील करून घेण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला नाही. **आंदोलकांनी तेल, प्लायवूड यांची नाकेबंदी केली पण चहाला हात लावला नाही हे लक्षणीय आहे.**

आज आंदोलकांच्या हातात स्थानिक वृत्तपत्रे आहेत, सरकारी नोकर मोठ्या संख्येने आंदोलनात सामील आहेत, पोलिसांचा पाठिंबा आहे. त्यामुळे आंदोलना बाबतचे एकांगी चित्र पुढे येते व बिगर आसामींवर काय अन्याय होतो आहे हे मांडले जात नाही. त्याबाबतची वस्तुस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे.

आज आंदोलकांच्या मागणीनुसार जर १९५१ हे प्रमाण वर्ष धरले तर त्याचा अर्थ काय होतो ? भारताच्या फाळणीनंतर लाखो निर्वासित पूर्व पाकिस्तानमधून बंगाल आसाममध्ये आले. त्यातील अनेक कामकरी कष्टकरी होते, असहाय्य होते. फाळणीच्या व स्थलांतराच्या धामधुमीमध्ये अनेकांचे सरहद्द पास, निर्वासित नोंद पत्रके गहाळ झाली. भारतीय नागरिकत्व घेण्याचा

'उपचार' अनेकांनी पुरा केला नाही. सरकारने त्यांना पडजभीन दिली. अनेक निर्वासितांना आसामने सामावून घेतले. त्यांची मुले भारताची नागरिक आहेत. अशा परिस्थितीत त्यांना नागरिकत्व शाबित करता यत नाही अशा तांत्रिक बाबीच्या आधारे हजारो कष्टकऱ्यांची हकालपट्टी करावयाची, अनेकांना पुन्हा एकदा निर्वासित बनवावयाचे हे कोणत्या न्यायात बसते? आज आंदोलनामुळे त्यांच्या जीवनात कमालीची अनिश्चितता निर्माण झाली आहे. कारण परकीयांना धमक्या देणे, लुटालुट करणे तसेच त्यांचेवर हल्ले चालू आहेत. गेल्या वर्षात झालेल्या हल्ल्यांमध्यें सुमारे १००० लोक ठार झाले, हजारो जायबंदी झाले, ६००० वर घरे नेस्तनाबूत झाली असा अंदाज आहे. सुमारे ४०,००० लोक आसाम सोडून (मुख्यतः बंगालमध्ये) हलले, पुन्हा निर्वासित झाले. निर्वासितांसाठी जलपैगुरीला दोन छावण्या उघडाव्या लागल्या. उदाहरणा दाखल डॉ. गुह यांनी आपल्या लेखात दिलेली (इकॉनॉमिक व पोलिटिकल वीकली–स्पेशल नंबर, १९८०) उत्तर कामरूपमधील एक घटना घेऊ.

तेथे बिगर–आसामियांवर हल्ले झाले. त्यात २५००० बेघर झाले. ठार झालेल्यांपैकी ८० ओळख पटलेल्यांमध्ये दोन सोडून बाकी सर्व अल्पसंख्यांक होते. परंतु प्रचार मात्र आसामियांवर हल्ले झाला असा केला गेला. पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबरटीज (नागरिक हक्क संरक्षण समिती) दिल्ली शाखेतर्फे आसामला भेट देऊन केलेल्या अहवालात म्हटले आहे की 'आज आसाममध्ये अल्पसंख्यांकांविरुद्ध व्देषाचे बीज पद्धतशीरपणे भिनविले जात आहे त्यात मुख्य रोष आहे बंगाल्यांवर. आंदोलकांनो सरकारी यंत्रणेवर जवळजवळ ताबा मिळविला आहे. बंगाल्यांविरुद्ध जहरी अपप्रचार चालू आहे. आणि त्यांच्यावर प्राणघातक हल्ले होत आहेत' बंगाली म्हणजे डावे असे समीकरण मांडून डाव्यांवरही हल्ले होत आहेत.

## आसाम प्रश्नावरील तोडगा

आजच्या बहुभाषिक आसामधील प्रश्नावर तोडगा काय? आसाममध्ये ६०% आसामिया भाषिक आहेत आणि परकीयांच्या वर्चस्वाचा वाढता धोका आहे असे मानण्यास वस्तुस्थितीचा आधार नाही. गेल्या १५० वर्षात अनेक परप्रांतीय आसाममध्ये आले. ते स्थानिक समाजात बऱ्याच अंशी सामावून गेले, जात आहेत. परंतु तरीही बिगर आसामिया-बंगाली. कार्बी आदिवासी आहेत, त्यांना भाषेबाबतचे स्वातंत्र्य देऊन आसाम राज्यातील विविधतेतून एकात्मता साधणे शक्य आहे. तेच आपल्या लोकशाही मूल्यांशी सुसंगत होय. स्वायत्ततेचे तत्त्व स्वीकारल्याने भाषा धर्म या आधारे फोफावणाऱ्या संकुचित राष्ट्रवादाला जे आक्रमक व घातक स्वरुप येत आहे त्यास आळा घालणे शक्य होईल. परंतु त्याचेऐवजी आसामी भाषेविना दुसरी भाषा शिक्षणामध्ये वापरण्याचा विकल्प असू नये (आसामिया ही १९६१ पासून अधिकृत राज्यभाषा आहे) आणि बिगर–आसामियांना आसाममध्ये स्थान नाही अशी भूमिका घेणे हे आत्मघातकी आहे. त्यामुळे आदिवासी, काचारवासी ह्यांना आसाममधून फुटून निघण्याची वेळ येईल. अनेक मुसलमान देशोधडीला लागतील. आणि ह्याचा फायदा कोणाला होईल तर जातीयवादी, एकाधिकारवादी अशा प्रतिगामी शक्तींना. आंदोलनामध्ये सहभागी असलेल्या मध्यम वर्गीयांनी हुकुमशाही शक्तींना कळत–नकळत असे उचलून धरण्याचे धोके डोळसपणे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

बिगर–आसामियांविरोध आंदोलनात (की ज्याचा फायदा भांडवलदार, जमीनदार, मळेवाले आदी घेणार) आपली शक्ती खर्च करण्याऐवजी आर्थिक विकासाचा पाया व्यापक करणे, आदिवासींना हस्तांतरित जमिनी व कुळांना जमीनदारांकडून जमिनीचा ताबा देणे, रोजगार व व्यवसाय वाढतील असे विकास–धोरण स्वीकारणे ह्या आधारे आंदोलन उभे करण्याच्या पर्यायाचा विचार करण्याची आज निकड आहे. गतवर्षी नेमण्यात आलेल्या दुभाषी कमिशनच्या अहवालानुसार आसामात शेती विकासास अद्याप भरपूर वाव आहे. पूर नियंत्रणाचा प्रश्न दुर्लक्षिलेला राहिला आहे. असे महत्त्वाचे प्रश्न आणि शेती व औद्योगिक विकसन क्षमता लक्षात घेऊन जनसामान्यांना विकास प्रक्रियेत सामील करून आसामची आर्थिक प्रगती करण्यात तरुणांनी पुढाकार घेतला तर त्यात साऱ्या आसामी जनतेचे हित आहे.

**– सुलभा ब्रह्मे**